(२५४)

(१५)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/१३५१/२०२१
दिनांक : २८/१० /२०२१

# झोपडपट्टी निर्मुलन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे **कलम ३ड अन्वये पुर्वसूचना**)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.२९९१, २९९२, गणेशनगर, भोसरी, एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुर्ण झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३९९०.३७ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.पुर्णायु एन्टरप्रायझेस यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२८/०७/२०२१ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि. २६/१०/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट २ नुसार सदर मिळकतीवर एकूण २५० झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १९३, अपात्र ५६व बंद ० आणि बिगर निवासी पात्र ०, अपात्र ० आणि सार्वजनिक बांधकामे एकूण १ या प्रमाणे एकुण पुनर्वसनास पात्र झोपडीधारक - १९३ तर अपात्र झोपडीधारक ५६ इतके ठरले आहेत; आणि

१००

ज्याअर्थी, सदर क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये पारित आदेशाद्वारे **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा अंतिम आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०१ ते ०७ जुलै, २०२१ पृष्ठ क्र. ५ व ६ वर प्रसिध्द करणेत आलेला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा रितीने योजनाक्षेत्रात दि.१४/०८/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे; आणि उक्त **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र** अंतिम आदेशास शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे.पुर्णाय एन्टप्रायझेस यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते स्थलांतरण करणेसाठी सोय करणेत येणार आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

सदर क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळवित आहे की,

१) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

२) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी.

३) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

४) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या

दिनांकापासून ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : सि.स.नं.२९९१, २९९२, गणेशनगर, भोसरी, एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड, पुणे

महानगरपालिका क्षेत्र : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

| गाव | सि.स.नं. | क्षेत्र ( चौ. मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| भोसरी, एम.आय. डी.सी., | सि.स.नं.२९९१, २९९२ | ३९९०.३७ चौ. मी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | पुर्वेस -टेल्को रोड | |
| | | | | पश्चिमेस - सि.स.नं.२९४८, २९४९, २९५० | |
| | | | | दक्षिणेस - सि.स.नं.२९९० | |
| | | | | उत्तरेस - सि.स.नं.२९९३ पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक :-२८/१० /२०२१

28.10.21

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

राजेंद्र निंबाळकर, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

कार्यवाहीस्तव प्रत -

१) संबंधित झोपडीधारक
२) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे सदर जाहीर प्रकटन योजना क्षेत्रात प्रसिध्द करणेकरीता.
३) विकासक मे.पुर्णायु एन्टरप्रायझेस, ०७, कृष्णांजली कृष्णपथ, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-०४
४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पिंपरी-चिचंवड, पुणे

माहितीस्तव प्रत -

१) मा. जिल्हाधिकारी, पुणे
२) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे
३) व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.